डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)
कुलसचिव
दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२

जा.क्र. साप्रवि/जीजी-१/परिपत्रक/ ०८ /२०२२ दिनांक:०९ /०४/२०२२

वाचा : १) विद्यापीठ परिपत्रक क्र. साप्रवि/जीजी-१/परिपत्रक/३५०६/२०२०, दिनांक. २८/०२/२०२०
२) दि. १७/०२/२०२२ रोजी संपन्न झालेल्या कुलगुरु समन्वय समितीच्या १८४ व्या सभेतील सुचना.

## परिपत्रक

दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र कृषि विद्यापीठे कुलगुरु समन्वय समितीच्या १८४ व्या सभेमध्ये मा. सदस्यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे- "या अगोदर विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना दुसऱ्या व चौथ्या शनिवारी सुट्टी होती. परंतु शासनाने पाच दिवसांचा आठवडा जाहीर केला असल्यामुळे प्रत्येक शनिवारी सुट्टी जाहीर केली आहे. मागील दोन वर्षे कालावधीमध्ये कोरोना संसर्गजन्य रोगामुळे कृषि विद्यापीठात शैक्षणिक व संशोधनात्मक कार्यामध्ये प्रगती होवु शकलेली नाही. पाच दिवसांचा आठवडा असल्यामुळे शेती विषयक पेरणी, मशागती अशी कामं वेळेवर करणे शक्य होत नाही तसेच शैक्षणिक वेळापत्रक सुध्दा पाच दिवसात बसत नाही. याशिवाय कृषि विद्यापीठांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या देखील अपुरी आहे. त्यामुळे राज्यातील अकृषि विद्यापीठांप्रमाणेच चारही कृषि विद्यापीठांमधील सर्व कार्यालये ही पहिल्या व तिसऱ्या शनिवारी सुरू राहातील (दुसऱ्या व चौथ्या शनिवारी बंद राहातील) अशी सर्वानुमते सुचना करण्यात आली व याबाबतचे आदेश चारही कृषि विद्यापीठांनी काढुन कामात सुसुत्रता आणण्यास त्याची मदत होईल. " असे नमुद आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठातील प्रलंबित कामे सुरळीत होण्याकरीता पुर्वीप्रमाणेच विद्यापीठांमधील सर्व कार्यालये ही पहिल्या व तिसऱ्या शनिवारी पुढील आदेशापर्यंत सुरू राहातील (दुसऱ्या व चौथ्या शनिवारी बंद राहातील) याची नोंद घ्यावी.

उपरोक्त आदेश दिनांक ०१ एप्रिल २०२२ पासून पुढील आदेशापर्यंत लागू राहातील.

मा. कुलगुरू महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये निर्गमीत.

**कुलसचिव**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

१) संचालक (सर्व) ----------
२) अधिष्ठाता (सर्व) ----------
३) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ----------
४) विभाग प्रमुख (सर्व) ----------
५) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व) ----------
६) विद्यापीठ नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यार्थी कल्याण अधिकारी
७) उपसंचालक (बियाणे)/ मुख्य बिजोत्पादन अधिकारी, म.प्रा.प्र., वणी रंभापूर/ संचालक (प्रक्षेत्र), म.सं.कें., अकोला.
८) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र ----------
९) प्रभारी अधिकारी, राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प (सर्व) ----------
१०) प्रभारी अधिकारी (सर्व) ----------
११) कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र (सर्व) ----------
१२) प्राचार्य, कृषितंत्र विद्यालय (सर्व) ----------
१३) उपकुलसचिव (आस्थापना/साप्रवि/वि.वि), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१४) सहाय्यक कुलसचिव/ सहाय्यक नियंत्रक (सर्व) ----------
१५) अधिदान व लेखाधिकारी (अकोला/नागपूर)
१६) मा. कुलगुरूं/ कुलसचिव यांचे स्वीय सहायक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरीता सादर.
१७) मा. कुलगुरूंचे तांत्रिक सचिव/ विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी यांना माहितीकरीता सादर.
१८) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS Cell), यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.
१९) सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
२०) ----------